“एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच. डी.

पदवी करीता सादर करावयाच्या शोध प्रंबधाचा आराखडा

संशोधक

श्री.शिंदे रामकिशन बाबुराव

एम.ए.,सेट (मराठी)

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सुनीता सांगोले

एम.ए. सेट, पीएच.डी. (मराठी)

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर.

सप्टेंबर - २०२२.

भूमिका :

मानव हा समाजाचा मुलभूत घटक असून तो समाजात लहानाचा मोठा होतो. बालकांच्या जीवनात लहान वयात जसे संस्कार होतात तसे ते मोठेपणी घडत असतात. शाळेत शिक्षक बालकांना कथा, कविता, नाटक इत्यादी बालवाङमय शिकवित असतात. त्यामुळे बालकांना आनंद मिळत असतो. बालसाहित्य हे आनंद देण्याचे कार्य करत असते.

आज बालसाहित्य हे फार कमी प्रमाणात लिहिले जात आहे. बालसाहित्याकडे साहित्यिकांचा कल फार कमी झाला आहे. किंबहूना बालसाहित्य हे उपेक्षित असल्यासारखे झाले आहे. बालसाहित्य हे उपक्षित राहू नये म्हणून त्यावर संशोधन झाले पाहिजे असे वाटते.

एकनाथ आव्हाड हे महाराष्ट्रातील प्रसिध्द साहित्यिक आहेत. त्यांनी बालकविता, बालकथा, काव्यकोडी, नाट्यछटा, चरित्र इत्यादी वाङमय लिहिले.त्यांनी लिहिलेले वाङमय समजून घेण्यासाठी त्यावर संशोधन झाले पाहिजे. म्हणून संशोधनासाठी त्यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड करण्यात आली आहे.

“एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास” या प्रस्तुत शोधनिबंधात त्यांनी लिहिलेल्या कविता संग्रहामधील अक्षरांची फूले, आभाळांचा फळा, खंरच सागंतो दोस्तानों, गंमत गाणी इत्यादी बालकवितांचा अभ्यास केला जाईल. तसेच त्यांच्या काव्यकोडी संग्रहामधील ‘मजेदार जोडी’, ‘मजेदार कोडी- भाग -1 व भाग- 2’. ‘आलं का ध्यानात?’ यांचा अभ्यास केला जाईल. त्यांच्या बालकथा ‘आनंदाची बाग’, ‘एकदा काय झालं’ ‘जरा ऐकून तर घ्या’,’ थेंब थेंब तळे साचे’ इत्यादी बालकथांचा अभ्यास केला जाईल. एकनाथ आव्हाड यांनी नाट्यछटा संग्रह ‘मला उंच उडू दे’ हे देखील लिहिले आहे. याचा देखील अभ्यास प्रस्तुत प्रबंधात केला जाईल. तसेच त्यांचे मिसाईल मॅन: ए.पी.जे. अब्दूल कलाम या चरित्राचा अभ्यास केला जाईल.

एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधात करुन त्या निमित्ताने बालसाहित्य समीक्षेकडे लक्ष वेधण्यास, नवीन बालसाहित्य निर्मितीस हे संशोधन महत्वाचा ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

“एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना :

मराठी साहित्यातील कथा, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या वाङमय प्रकारापैकी बालसाहित्य हा प्रकार बालकांसाठी अतिशय लोकप्रिय आहे. कारण बालसाहित्यात बालजीवनाचे दर्शन घडविणारा, बालजीवनाची सखोलता प्रतिबिंबीत करणारा, बालकांच्या विविध प्रश्नांची चिकित्सा करणारा, उद्बोधन, प्रबोधन करणारा आणि संपूर्ण बालजीवनाला कवेत घेणारा हा प्रवाह आहे.

मराठी साहित्याची परंपरा फार प्राचीन व प्रदीर्घ आहे. मराठी साहित्य विश्वात बालसाहित्यांने मोलाचे कार्य केले आहे. बालकांच्या जीवनाचा पाया घालण्याचे कार्य बालसाहित्याने केले आहे. मातीच्या मुर्तीला जसा आकार द्यावा तशी ती मूर्ती घडत असते तसेच बालसाहित्या बाबत म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

बालसाहित्यात बालकांच्या भावविश्वाला अनुरूप लेखन करण्यात आलेले असते. किंबहूना बालकांना समोर ठेवूनच बालसाहित्याची निर्मिती झालेली असते. बालकांच्या मनातील प्रश्न, विचार, त्यांच्या आवडी-निवडी इत्यांदी बाबींचा अवलंब बालसाहित्यात केलेला असतो.

आज मराठी साहित्यात बालसाहित्य मोलाचे कार्य करीत असले तरी बालसाहित्य फार अत्यल्प प्रमाणात लिहिले जात आहे. फार कमी साहित्यिकांचा बालसाहित्याकडे कल आहे. आज असे वाटते की, बालसाहित्य उपेक्षित राहते की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे.

मराठी साहित्यात आतापर्यंत एकनाथ आव्हाड, बालकवी, इंदिरा संत, मंगेश पाडगावकर, सुरेश सावंत, भगवान अंजनीकर , विलास सिंदगीकर, दासू वैद्य या सारख्या बाल संवेदना जाणऱ्या इत्यादी साहित्यिकांनी बालसाहित्य निर्माण करून मराठी साहित्यात आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे.

मराठी साहित्यात कथा, कादंबरी, कविता, नाटक मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. परंतु हे सर्व निर्माण फक्त तरूण व जेष्ठ व्यक्ती यांना डोळयासमोर ठेऊन लिहिले जात आहे. एकनाथ आव्हाडा सारख्या साहित्यिकांनी मात्र बालकांना डोळयासमोर ठेऊन आपले बालसाहित्य निर्माण केले आहे. त्यांनी केलेले कार्य अत्यंत स्तुत्य आहे. म्हणून एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याचा अभ्यास करून संशोधन करण्याची इच्छा माझ्या मनात आली आहे. बालसाहित्याचे संशोधन करून एकनाथ आव्हाड यांचे बालसाहित्य वाचकासमोर ठेवावे अशी इच्छा निर्माण झाली.

एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास हा विषय घेऊन माझ्या मार्गदर्शक प्रा. डॉ. सुनीता सांगोले मॅडम यांच्याशी चर्चा केली आणि त्यांनी या विषयाला मान्यता दिली. प्रस्तुत विषय मी पीएच.डी संशोधन कार्यासाठी निश्चित केला आहे. या दृष्टीकोनातून साहित्याचे वाचन करून शोध प्रबंधाची रुपरेषा तयार केली आणि या रुपरेषेनूसार संशोधन कार्य केले जाईल.

संशोधन विषयाची उदिष्टये :

1 एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्यातील योगदानाचा आढावा घेणे.

2 एकनाथ आव्हाडांच्या बालकवितेचा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने शोध घेणे.

3 बालकथा लेखनात एकनाथ आव्हाड यांनी दर्शविलेल्या वैविध्यपूर्णतेचे आकलन करून घेणे.

4 एकनाथ आव्हाड यांच्या लेखनाधारे ‘काव्यकोडी’ या वाङ:मय प्रकाराची ओळख करून घेणे

5 एकनाथ आव्हाडांचे बालसाहित्यकार म्हणूनवेगळेपण नोंदविणे.

6 एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा अभ्यास व चिकित्सा करून साहित्याचे विशेष नोंदविणे व ठळक असे निष्कर्ष काढणे.

संशोधन पध्दती :

एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास या शोध प्रबंधाच्या पुर्ततेसाठी बालकांसाठी निर्माण करण्यात आलेल्या सर्व साहित्याचा आधार घेतला जाईल. बालसाहित्याचा प्रभाव या अंगाने उलघडा करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा तसेच वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. जेष्ठ रसिकवाचक यांच्याकडूनही पूरक माहिती संकलीत केली जाईल. तसेच बालसाहित्यावर प्रकाशित झालेले सर्व मासिके व लेख यांचाही अभ्यास केला जाईल. तसेच गरज भासल्यास प्रत्यक्ष संवादातून संशोधन पूर्ण केले जाईल.

एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास करतांना पूर्वसुरेच्या बालसाहित्यिकांचा संक्षिप्त वेध घेतला जाईल. एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या एकुणच बालसाहित्याचे संकलन केले जाईल. पुढे विश्लेषणात्मक, वर्णनात्मक पध्दतीने या बालसाहित्याची निकित्सा केली जाईल. यासाठी बालसाहित्यावर प्रकाशीत समिक्षा ग्रंथ, मासिके व लेख यांचा अभ्यास केला जाईल. रसिक वाचक, समिक्षकांनी नोंदवलेले अभिप्राय याचीही दखल घेऊन आधारभूत ग्रंथाच्या साह्याने ही चिकित्सा केली जाईल. गरज भासल्यास प्रत्यक्ष संवादातून हे संशोधन पूर्णत्वाला नेण्यासाठी लेखकाच्या मुलाखतीचाही वापर केला जाईल.

संशोधनाची सामग्री :

एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावरील संशोधनासाठी समिक्षाग्रंथाचा वापर केला जाईल. तसेच अभ्यासपूरक विविध वैचारीक विषयाला अनुरुप असलेल्या वेगवेगळया वाङमयीन बालसाहित्याचा अभ्यास केला जाईल. बालसाहित्यावर प्रकाशीत झालेले मासिके, वर्तमानपत्रे, नियतकालिके, दिवाळीअंक, साप्ताहिके, लेख, तसेच इंटरनेट उपलब्ध इत्यांदी सामुग्रीचा वापरही केला जाईल.

संशोधन विषयाचे महत्त्व:

संशोधन म्हणजे सत्य शोधणे होय. संशोधनामुळे संशोधनाची सखोल माहिती मिळते. बालवाड:मयआज आपल्या देशात दुर्मिळ होत जात आहेत. बालसाहित्याकडे वाचक वर्ग वळवण्यासाठी बालसाहित्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. बालसाहित्य हे बालमनाचे भावविश्व उलगडून दाखवण्याचे कार्य करते. बालमनाला आनंद देण्याचे कार्य ही बालसाहित्य करत असते. बालसाहित्यावर संशोधन केल्यास बालसाहित्य निर्मितीस प्रेरणा मिळेल. बालसाहित्याचे आजचे साहित्यिक एकनाथ आव्हाड यांच्या साहित्यातील योगदानाची, प्रयोगशिलतेची ओळख मराठी, जगताला होईल.

संशोधन विषयाचे वेगळेपण:

संशोधन कार्याचा विचार केला तर कोणत्याही विषयावर केलेले संशोधन पूर्ण नसते. त्यामुळे संशोधन परिपक्वरीत्या पूर्ण करणे गरजेचे असते. प्रस्तुत प्रबंधात बालकांच्या जीवनाचे वास्तव उलगडले जाईल, बालमनाचा उलगडा केला जाईल. बालमनाचे बालविश्व याचा शोध घेतला जाईल. बालजीवन समजून घेतले जाईल. आज बालसाहित्य अत्यल्प प्रमाणात लिहिले जात आाहे. बालसाहित्यात संशोधन झाल्यास ही उणीव समोर येईल.

एकनाथ आव्हाड यांच्या निमित्ताने बालसाहित्यातील प्रयोगशिलता, बालसाहित्याचे आजचे रूप आणि बालकांच्या विकासास बालसाहित्यामुळे लागणारा हातभार लक्षात येईल. म्हणूनच प्रस्तुत लेखकांच्या निमित्ताने मी हा विषय संशोधनासाठी घेतला आहे.

'एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास' संशोधनासाठी प्रकरणनिहाय विभागणी:

प्रकरण पहिले : मराठी बालसाहित्याचे स्वरूप

प्रकरण दूसरे : एकनाथ आव्हाड यांचा व्यक्तीत्ववेध

प्रकरण तिसरे : एकनाथ आव्हाड यांचे बालकविता लेखन

प्रकरण चौथे : एकनाथ आव्हाड यांचे बालकथालेखन

प्रकरण पाचवे : एकनाथ आव्हाड यांचे काव्यकोडी, बालनाट्यछटा व चरित्रलेखन

प्रकरण सहावे : एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याचे विशेष

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि उपसंहार

I प्रकरण पहिले : मराठी बालसाहित्याचे स्वरूप

1 बालसाहित्याचे स्वरुप

2 बालसाहित्याची व्याखा

3 संशोधन पध्दती

4 संशोधन विषयाची गृहीतके

5 बालसाहित्याची वैशिष्टये

II प्रकरण दूसरे : एकनाथ आव्हाड यांचा व्यक्तीवेध

1 एकनाथ आव्हाड यांचा जन्म

2 एकनाथ आव्हाड यांचे शिक्षण

3 एकनाथ आव्हाड यांची साहित्यसंपदा

III प्रकरण तिसरे: एकनाथ आव्हाड यांचे बालकविता लेखन

1 बालसाहित्याचे प्रकार

2 शिशुगीत

3 बडबडगीत

4 संवादगीत

5 क्रीडागीत

6 बालगीत

IV प्रकरण चौथे: एकनाथ आव्हाड यांचे बालकथालेखन

1 बालकथा साहित्याची व्याप्ती

2 बालकथेचे प्रकार

3 बालकथेचे भावविश्व

4 निष्कर्ष

V प्रकरण पाचवे: एकनाथ आव्हाड यांचे काव्यकोडी, बालनाट्यछटा व चरित्रलेखन इत्यादी साहित्याचा सखोल अभ्यास.

1 कथालेखन

2 कवितालेखन

3 काव्यकोडी लेखन

4 चरित्र लेखन

5 बालनाट्यछटा लेखन

VI प्रकरण सहावे: एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याचे विशेष

1 एकनाथ आव्हाड बालसाहित्य लेखनासाठी मोठे योगदान आहे. कथा, कविता, काव्यकोडी लेखन, चरित्र, बालनाट्यछटा लेखन इत्यादी वाङमय प्रकारामध्ये वैविध्यपूर्ण आशयासह अभिव्यक्त केली आहे.

2 एकनाथ आव्हाड यांनी मुलांचे मनोरंजन व प्रबोधन करणारे बालसाहित्य निर्माण केले.

3 बालविश्वात जाऊन साहित्य निर्माण करण्याचे आव्हान एकनाथ आव्हाड यशस्वीपणे पेललेले आहे.

एकनाथ आव्हाड यांनी बालसाहित्यात दिलेल्या योगदानाचे संकलन, विश्लेषण, मूल्यमापन करत असतानांच मराठी बालसाहित्य विश्वातील त्यांचे स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या निमित्ताने होईल. प्रस्तुत प्रकरणात त्यांच्या बालसाहित्याचे निष्कर्ष सांगून संशोधनाचा सारांश रुपात उपसंहार केला जाईल.

VII प्रकरण सातवे: निष्कर्ष आणि उपसंहार

1 एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत प्रबंधात प्रत्येक प्रबंधात केलेले संशोधन आणि संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष यांची तपशीलवार पणे मांडणी या प्रकरणात केली आहे. एकनाथ आव्हाड यांच्या बालसाहित्याचे स्वरूप, व्यक्तीवेध तसेच त्यांचे बालकविता, कथा, काव्यकोडी इत्यादीचा तपशीलवार मांडणी प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे. त्यांच्या प्रस्तुत प्रबंधातील सर्व प्रकरणाचे मुल्यमापन ह्या प्रकरणात केले जाईल.आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने एकनाथ आव्हाड यांच्या साहित्याची विविधता लक्षणीय आहे. अशा वैशिष्टयांचा शोध घेतला जाईल.

एकनाथ आव्हाड यांचे प्रकाशित साहित्य

बालकवितासंग्रह

1. अक्षरांची फुले
2. आभाळाचा फळा
3. खरंच सांगतो दोस्तांनो
4. गंमतगाणी
5. तव्व्यातला खेळ
6. पंख पाखरांचे
7. बोधाई
8. मज्जाच मज्जा
9. हसरे घर
10. सवंगडी
11. मजेदार गाणी
12. आनंद झुला
13. शब्दांची नवलाई
14. छंद देई आनंद

काव्यकोडी संग्रह

1. मजेदार जोडी
2. मजेदार कोडी - भाग १ व २
3. आलं का ध्यानात?
4. खेळ आला रंगात

बालकथासंग्रह

1. आनंदाची बाग
2. एकदा काय झालं

3. जरा ऐकून तर घ्या

4. थेंबे थेंबे तळे साचे

5. निष्फळ भांडण

6. राजा झाला जंगलाचा

7. खळाळता अवखळ झरा

नाट्यछटा संग्रह

1. मला उंच उडू दे

चरित्र

1. मिसाईल मॅन : डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम (भाग - १ ते ४)

काव्यसंग्रह

1. नव्याने बहरावे

संदर्भ ग्रंथ

१.परंपरा आणि नवता : गो. वि. करंदिकर

२. बालवाङ्मय - देविदास बागूल

३. बालसाहित्याची रुपरेखा - मालती दांडेकर

४. मराठी बालसाहित्य : प्रवाह आणि स्वरुप - सुलभा शहा

संदर्भग्रंथ सूची

1 कावळे, छाया: स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी बालकथा साहित्य : स्वरूप व चिंतन, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1 मे 2012 पृष्ठ संख्या 248

2 खांडगे, मंदा दीक्षितज लीला: बालशिक्षण साहित्य: विविध आयाम, प्रतिमा प्रकाशन, पूणे प्रथमावृत्ती 19 ऑगस्ट 2006 पृष्ठ संख्या 272.

3 गणोरकर, प्रभा, डहाके, वसंत आबाजी डहाके: 'संज्ञा-संकल्पना कोश' ग.रा. भटकल फाऊडेशन, मुंबई. पहिली आवृत्ती 2001, पृष्ठ संख्या 384.

4 डांगे, चंद्रकुमार : (संपा.) महाराष्ट्रातील बालवाङमय प्रवाह दे.श्री. जोशी व म.द. लोखंडे चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पूणे.

5 दांडेकर, मालतीबाई : 'बालसाहित्याची रुपरेखा', मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर मुंबई, पहिली आवृत्ती 1964.

6 दीक्षित, लिला : मराठी बालसाहित्य : विचार आणि दर्शन, चेतक बुक्स पुणे. प्रथमावृत्ती 4 फेब्रुवारी 2015, पृष्ठ संख्या 216.

7 बोरसे, विद्या : 'बालसाहित्य: आकलन आणि समिक्षा', स्पर्श प्रकाशन राजापूर जि. रत्नागिरी, प्रथमावृत्ती 22 आक्टोंबर 2015, पृष्ठ संख्या 160.

8 भागवत, लीलावती: मराठी बालसाहित्य प्रवाह आणि स्वरूप नवीन उद्योग, पूणे. प्रथमावृत्ती 6 सप्टेंबर 1995 पृष्ठ संख्या 436.

मार्गदर्शक

Dr. Sunita P. Sangole
Research Guide & Research Centre,
Dayanand College of Arts, Latur.

डॉ. सुनीता सांगोले

संशोधक

शिंदे रामकिशन बाबुराव